# गुरुमाई चिद्विलासानंद यांच्याद्वारे लिखित पुस्तक
# अंतःशुद्धीचे सोपान
## *उद्धरण ११*

भगवद्गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण म्हणतात :

*ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति*

हे अर्जुना, परमात्मा सर्वांच्या हृदयामध्ये निवास करतो. [१८:६१]

हृदय सत्याचे निवासस्थान आहे. तुम्हाला जेव्हा ज्ञान प्राप्त करायचे असते, तेव्हा तुम्हाला त्या अंतर-स्थानामध्ये प्रवेश करावा लागतो. तुम्ही मंत्राचा जप करीत असाल आणि तुम्हाला त्यात निहित असलेल्या सत्याचा अनुभव घ्यायचा असेल किंवा तुम्ही एखादे पुस्तक वाचत असाल, एखाद्या शास्त्रीय ग्रंथाचे वाचन करीत असाल वा एखादे प्रवचन ऐकत असाल; तरी केवळ बुद्धीद्वारे तुम्ही आध्यात्मिक ज्ञान ग्रहण करू शकत नाही. तुम्ही बुद्धीला ज्या रूपात जाणता, त्या बुद्धीचे शुद्धीकरण होणे अत्यावश्यक आहे. मग गहन हृदयाकाशाच्या अंतरतम स्थानातून ज्ञानाचा उदय होतो.

© २०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

गुरुमाई चिद्विलासानंद, *अंतःशुद्धीचे सोपान : दिव्य सद्गुणांचा योग,* अध्याय ४ ‘ज्ञानामध्ये दृढता,’ यामधून उद्धृत [चित्शक्ती पब्लिकेशन्स, २०१३], पृ. ६०.